# निविदा पुस्तिका

## राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र" भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव सादर करणे

(REQUEST FOR PROPOSAL)

**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे**
सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी,
पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे ,
ता. मावळ, जि .पुणे पिन - ४१०५०६ ,
भ्रमणध्वनी क्र. ७७४१०५७७७७
ईमेल: project@nipht.org
संकेतस्थळ : www.nipht.org

**निविदा प्रसिध्दी दिनांक - १०/०७/२०२५**

**अनुक्रमणिका**


| अ. क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | निविदा सुचना | ३ |
| २. | प्रस्तावना | ४ |
| ३. | निविदा मागणी | ४ |
| ४. | निविदा धारकांना सुचना | ४ |
| ५. | सुरक्षा ठेव रक्कम (SD) | ५ |
| ६. | निविदा कार्यपध्दती | ५ |
| ७. | पात्रतेचे निकष | ५ |
| ८. | निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती | ५ ते ७ |
| ९. | निविदा धारक निवडीचे निकष | ७ |
| १०. | निविदा सादर करण्याची पध्दत | ८ |
| ११. | सूची–१ व २ (तांत्रिक प्रस्ताव) | ९ ते १० |
| १२. | सूची – ३ आर्थिक प्रस्ताव | ११ |

**१. निविदा सुचना - राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.**

MSAMB's NIPHT HORTICULTURE TRAINING CENTER

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे

सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी, पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे,ता. मावळ, जि .पुणे पिन - ४१०५०६ ,
भ्रमणध्वनी क्र. ७७४१०५७७७७, ईमेल: project@nipht.org, संकेतस्थळ : www.nipht.org

## निविदा सुचना

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेची "बांबू मुल्यवर्धन केंद्र" भाडेतत्वावर देणेकरिता प्रस्ताव सादर करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ठिकाण व पत्ता | "बांबू मुल्यवर्धन केंद्र" |
|---|---|---|
| १. | सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी,पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे , ता. मावळ, जि .पुणे पिन - ४१०५०६ | ०१ संख्या |

१. निविदा www.nipht.org या संस्थेच्या वेबसाईट वर दि.१०/०७/२०२५ पासून दि.२४/०७/२०२५ पर्यंत उपलब्ध आहे.

२. निविदा सादर करावयाचा कालावधी दि. १०/०७/२०२५ ते दि.२४/०७/२०२५, १७.०० वाजेपर्यंत.

**संचालक**

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे, येथील ऊतिसंवर्धन प्रयोगशाळा भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव सादर करणे

(REQUEST FOR PROPOSAL)

## २. प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेची स्थापना कृषि उत्पादनोत्तर तंत्रज्ञानामध्ये प्रगती करण्याच्या दृष्टीने व उपयुक्त यशस्वी तंत्रज्ञान कमी खर्चामध्ये उत्पादकापर्यंत पोहचविण्याकरीता केली आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेची नोंदणी दि. १०.१२.१९९८ रोजी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वयेअशासकीय संस्था व दि. १२.१.१९९९ रोजी मुंबई चॅरीटेबल ट्रस्ट ॲक्ट, १९५० अंतर्गत पब्लीक ट्रस्ट म्हणुन नोंदणी झालेली आहे. या संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष हे मा. मंत्री, सहकार , वस्त्रोद्योग व पणन ,महाराष्ट्र शासन असून कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे हे पदसिध्द सचिव आहेत.

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे "बांबू मुल्यवर्धन केंद्र"भाडेतत्वावर देणेचे प्रयोजले असुन त्याकरिता निविदा प्रक्रिया अंमलात आणणेचा निर्णय घेतला आहे. सदरचे "बांबू मुल्यवर्धन केंद्र" "ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत" (as is where is basis) निवड प्रक्रियेद्वारे निवडलेल्या व्यक्ती, फर्म, नोंदणीकृत खाजगी कंपनी यांना भाडेतत्वावर देण्यात येणार आहेत.

## ३. निविदा मागणी –

१. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे, येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र" भाडे तत्वावर देणे बाबत निविदा धारकांकडून निविदा मागवित आहे.

२. निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती निविदा पुस्तिके मध्ये नमूद केलेल्या आहेत.

३. अधिक माहितीसाठी तळेगाव दाभाडे येथील कार्यालयाशी संपर्क साधावा.

४. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्वीकृत करणे अथवा अस्वीकृत करण्याचे अधिकार, संचालक - राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे यांनी राखुन ठेवलेले आहेत.

## ४. निविदाधारकांना सूचना -

१. निविदेमधील अटी व शर्तीव्यतिरीक्त इतर शर्तीसह (Conditional Tender) निविदा सादर केल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

२. निविदा उघडणे प्रक्रिये अंतर्गत पहिल्यांदा मागणी केलेल्या कागदपत्रांनुसार तांत्रिक कागदपत्रे तपासण्यात येतील. तांत्रिक तपासणी झाल्यानंतरच्या छाननीत पात्र निविदा धारकांचे आर्थिक बाबी पाहण्यात येतील.

३. मुद्दा क्र.२ नुसार कार्यवाही पुर्ण केल्यानंतर पात्र निविदा धारकांची माहिती सांगण्यात येईल.

४. प्रत्यक्ष "बांबू मुल्यवर्धन केंद्र" पाहणी करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत सकाळी ९.१५ ते सायंकाळी ५.४५ या वेळेत, सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी, पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे,ता. मावळ, जि .पुणे पिन - ४१०५०६ , येथे भ्रमणध्वनी क्र. ७७४१०५७७७७ वर संपर्क साधावा.

**५. सुरक्षा ठेव रक्कम (SD) -**

तांत्रिक व आर्थिक बाबींच्या आधारे पात्र निविदाधारकांची निविदा अंतिम केली जाईल व अंतिम निवड झालेल्या निविदा धारकाशी करारनामा झाल्यानंतर त्या निविदा धारकास सुरक्षा रक्कम ठेव संस्थेमध्ये धनादेशाद्वारे जमा करावी लागेल.

**६. निविदा कार्यपध्दती व निविदा सादर करण्याचे वेळापत्रक** (Key Dates):-

१. निविदा — सदर निविदा www.nipht.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. निविदा धारकांनी सविस्तर निविदा सुचनेतील दिनांक जसे कि, निविदा सादर करण्याची सुरुवातीची दिनांक व अंतिम दिनांक यानुसारच निविदा सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**७. पात्रतेचे निकष-**

१. कोणतीही व्यक्ती, फर्म, नोंदणीकृत खाजगी कंपनी या प्रक्रियेत भाग घेणेस पात्र आहेत.

२. अर्जदार नोंदणीकृत खाजगी कंपनी असल्यास त्यांचे संबंधीत कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सादर करणे बंधनकारक आहे.

३. निविदा धारकाने "बांबू मुल्यवर्धन केंद्र" भाडे दर हा प्रति वर्षाप्रमाणे निविदेमध्ये आर्थिक प्रस्तावात नमुद करावयाचा आहे. नमुद केलेला भाडे दर अंकात आणि अक्षरी देणे बंधनकारक आहे. अंकातील दर आणि अक्षरातील दरात फरक असल्यास जो दर जास्त असेल तो गृहित धरण्यात येईल.

**८. निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती -**

१. भाडेपट्टा कराराचा कालावधी हा ३६ महिन्यांकरिता राहील व जागा भाडे हे निविदा निवड प्रक्रियेमध्ये अंतिम झालेल्या वर्षाप्रमाणे दरानुसार आकारणी करण्यात येईल. निविदेतुन निश्चित करण्यात आलेल्या दरामध्ये प्रत्येक १२ महिन्यानंतर आधीच्या भाड्याच्या रक्कमेत १० टक्के भाडेवाढ करण्यात येईल.

२. प्रती वर्षा दरानुसार पुढील वर्षाची होणारी भाडे रक्कम आगाऊ स्वरूपात धनाकर्षाद्वारे एकरकमी स्वरुपात संस्थेमध्ये जमा करणे बंधनकारक आहे.

३. तसेच **सुरक्षा ठेव** रक्कम म्हणुन रु.**५० हजार** संस्थेकडे धनाकर्षाद्वारे एकरकमी करार होताच ८ दिवसाच्या आत जमा करावी लागेल. सदर रक्कम भाडे करार कालावधीची मुदत संपुष्टात आल्यानंतर जागा खाली करून संस्थेच्या ताब्यात दिल्यानंतर बिनव्याजी परत करण्यात येईल.

४. निवड झालेल्या निविदाधारकाने ८ दिवसाच्या आत वरील नमुद भाडे व सुरक्षा ठेव रक्कम न भरल्यास प्रतिक्षा यादीतील पुढील निविदा धारकास ग्राह्य धरण्यात येईल.

५. "बांबू मुल्यवर्धन केंद्र" भाडेतत्वावर दिलेनंतर पहिल्या १२ महिन्याचे आत परत करता येणार नाही.

६. निवड झालेल्या निविदाधारकांना त्याच्या विद्युत वापरापोटी स्वतंत्र सबमीटरद्वारे आलेल्या युनीटच्या निर्धारीत दरानुसार बिल आकारण्यात येईल व आकारणी दिनांकापासुन त्याची रक्कम ८ दिवसाच्या आत संस्थेकडे अदा करावी लागेल.

७. सदरचे "बांबू मुल्यवर्धन केंद्र" ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत हस्तांतर करण्यात येतील.

८. मुळ बांधकामामध्ये कोणतेही फेरबदल, वाढीव बांधकाम करणे किंवा सद्यस्थितीतील बांधकाम पाडणे यासारखी कृत्ये करता येणार नाहीत.

९. "बांबू मुल्यवर्धन केंद्र" तील कोणत्याही वस्तुच्या व कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी निविदाधारकाची असेल. याबाबत संस्था कोणत्याही बाबतीत जबाबदार राहणार नाही. "बांबू मुल्यवर्धन केंद्रा"त झालेली चोरी अथवा परीसरातील आगेमुळे होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार असणार नाही.

१०. संस्थेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता निविदा धारकाला घ्यावी लागेल. काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई त्यास द्यावी लागेल. अन्यथा झालेल्या/ होणा-या खर्चाची रक्कम सुरक्षा ठेव रकमेमधुन कपात करून घेण्यात येईल.

११. संस्थेचे प्रतिनिधी यांनी सुचित केलेल्या अधिका-यांस "बांबू मुल्यवर्धन केंद्र" मध्ये प्रवेश देणे बंधनकारक राहिल.

१२. हस्तांतरीत करण्यात आलेल्या "बांबू मुल्यवर्धन केंद्र" मध्ये पोटभाडेकरु ठेवता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर निविदाधारकांकडुन "बांबू मुल्यवर्धन केंद्र" ताब्यात घेण्यात येईल.

१३. हस्तांतरीत करण्यात "बांबू मुल्यवर्धन केंद्र"रसायने, काचसामान,उपकरणे कॅलिब्रेशन, हाऊस किपिंग, पेस्ट कंट्रोल स्वखर्चाने करणे बंधनकारक आहे.

१४. निवड प्रक्रियेतुन निवड झालेनंतर संबंधितांना १५ दिवसांच्या आत संस्थेसोबत नोंदणीकृत भाडेकरारनामा करून घ्यावा लागेल. करारनाम्याचा मसुदा संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच भाडे करारनामा संबधित दुय्यम निबंधक याचे कार्यालयात नोंदणी करणेची कार्यवाही व या प्रक्रियेचा संपुर्ण खर्च संबंधित निविदाधारकास करावा लागेल. वेळेत करार न केल्यास "बांबू मुल्यवर्धन केंद्र" परत घेण्यात येईल.

१५. करार प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदर निविदाधारकांनी त्यांच्या संस्था/कंपनीचा नामफलक लावणे अपेक्षित असुन सदर फलक लावावयाची जागा संस्थेने निश्तिच केलेल्या जागेवरच लावणे बंधनकारक आहे.

१६. "बांबू मुल्यवर्धन केंद्र" वापराबाबत कोणताही वाद असल्यास संस्था व निविदा धारक यांनी सामंजस्याने सोडवावा. तसे न झाल्यास संचालक, रा.सु.प.तं.संस्था-तळेगाव यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहिल.

१७. पहिल्या १२ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर उर्वरीत करार कालावधी अगोदर "बांबू मुल्यवर्धन केंद्र"खाली करावयाची असल्यास १ महिन्याची लेखी पुर्वसुचना संस्थेस द्यावी लागेल. अन्यथा पुर्वसुचना न देता सोडल्यास अनामत रकमेतुन तीन महिन्याचे भाडे वजावट करण्यात येईल.

१८. आपत्कालीन परिस्थितीमधे संस्थेस "बांबू मुल्यवर्धन केंद्र" खाली करुन घ्यावयाची असल्यास ती निविदा धारकांस तात्काळ खाली करून द्यावी लागेल.

१९. सदर "बांबू मुल्यवर्धन केंद्र"मधे कामगार अथवा व्यक्ती यांना वास्तव्य करता येणार नाही. तसेच ज्वलनशील पदार्थ / गॅस हाताळणी काळजीपूर्वक करावी,

२०. "बांबू मुल्यवर्धन केंद्र"समोरील परिसराची निगा व स्वच्छता राखण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची असेल.

२१. स्थापत्य कामकाजाव्यतिरिक्त देखभाल व दुरुस्तीचे कामकाज निविदाधारकास स्वखर्चाने करावे लागेल. या पोटी संस्था कुठलीही रक्कम देय होणार नाही.

२२. सदरची निविदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करणे किंवा एखादी निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा सर्वस्वी अधिकार संस्थेचा राहील.

२३. उपरोक्त कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता संस्था "बांबू मुल्यवर्धन केंद्र"खाली करुन घेईल व निविदाधारकाने जमा केलेली रक्कम परत न देण्याचा सर्वस्वी निर्णय संस्थेचा असेल.

२४. करारनामा संपलेनंतर निवडलेल्या निविदाधारकाने संबंधीत "बांबू मुल्यवर्धन केंद्र" सुस्थीतीत व योग्य अवस्थेत संस्थेस परत करावी लागेल. जर संस्थेच्या स्थावर मालमत्तेचे नुकसान झाले तर त्याची रक्कम सुरक्षारक्कमेतुन वसुल करणेत येईल.

२५. निविदाधारकाने प्रात्यक्षिक म्हणुन संस्थेच्या आवारात बांबू शेडनेटची उभारणी करणे, बांबूपासुन कांदा चाळ उभारणी,संस्थेमध्ये बांबू प्रशिक्षण कार्यक्रमास मदत करणे, कृषी पर्यटन साठी बांबूपासुन संस्थेमध्ये बांबू Hut तयार करणे.इ. केले तर त्याचा फायदा संस्थेला व निविदाधारकास होईल.

२६. निविदा धारकाने दोन लिफिफामध्ये निविदा भरावी. लिफाफावर तांत्रिक व आर्थिक बाबींच्या उल्लेख करावा व एकत्रित दोन लिफाफे एका मोठ्या लिफाफामध्ये विषय लिहुन प्रशासन विभागात सिलबंद जमा करावे.

## ९. निविदा धारक निवडीचे निकष -

१. कागदपत्रांची तांत्रिक छाननी पुर्ण होत असल्यासच आर्थिक बाबी पाहण्यात येईल.

## १०. निविदा सादर करण्याची पध्दत -

### १०.१ तांत्रिक छाननी :-

**तांत्रिक बाबींमध्ये-निविदा पुस्तिकेतील सुची १ व सुची २ नुसार माहिती सादर करावयाची आहे. आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकीत करुन सादर करावीत.**

१. अर्जदार, नोंदणीकृत कंपनी, फर्म, नोंदणीकृत खाजगी कंपनी असल्यास त्यांचे संबंधीत कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड व संस्था/कंपनी प्रमुखाचे आधार कार्ड सादर करणे बंधनकारक आहे.

२. निविदेमध्ये सादर केलेली कागदपत्रे वाचता येण्यासारखी व सुस्पष्ट असावीत. अन्यथ: निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

३. तांत्रिक छाननीमध्ये यशस्वी झाल्यानंतर निविदा धारकांचे आर्थीक बाबी पाहण्यात येतील.

### १०.२ आर्थिक निविदा :-

**आर्थिक बाबीकरिता निवीदा पुस्तिकेतील सुची ३ नुसार माहिती सादर करावयाची आहे.**

१. निविदा धारकांनी आर्थिक प्रस्तावामध्ये दर भरुन सादर करणे आवश्यक आहे.

**सूची -१:**
**प्रती,**
**मा. संचालक,**
सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी,
पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि .पुणे पिन – ४१०५०६ .

**विषय - राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र"भाडेतत्वावर देणेकरीता**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | अर्जदार व्यक्ती / कंपनीचे नाव | |
| २. | अर्जदाराचा पुर्ण पत्ता-<br>फोन नं-<br>ई मेल-<br>मोबाईल नं.- | |
| ३. | नोंदणी क्रमांक व नोंदणी वर्ष (लागु असल्यास) | |
| ४. | कोणत्या क्षेत्रात काम करीत आहात | |
| ५. | संपर्कासाठी जबाबदार व्यक्तीचा पत्ता, फोन नं व ईमेल | |
| ८ | अर्जदारा व्यक्ती/ कंपनीचा पॅन नं. --------------<br>आधार नं. ----------------------<br>जी.एस.टी.नं.-------------------- | |

मला/आम्हाला आपल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. त्यास अधिन राहुन प्रस्ताव दाखल करीत आहोत.

ठिकाण -
दिनांक-

आपला विश्वासु,

नाव व सही

**सूची -२:**
**तांत्रिक छाननी**

**विषय - राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र"भाडेतत्वावर देणेकरीता**

| **कागदपत्र क्र.** | **कागदपत्रे** | **सोबत** |
|---|---|---|
| १. | शेतकरी अथवा व्यक्ती अथवा कंपनी असल्यास मागील तीन वर्षाचे आयकर कागदपत्रे | **होय/नाही** |
| २. | खाजगी कंपनी असल्यास संबंधीत कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्नाचे चार्टंड अकाऊटंट प्रमाणपत्र | **होय/नाही** |
| ३. | प्रत्येक पानावर निविदाधारकाने स्वाक्षरी केलेली आहे | **होय/नाही** |
| ४. | पात्रतेच्या निकषामध्ये नमुद करण्यात आलेली सर्व कागदपत्रे | **होय/नाही** |

**टिप-** वर (सूची क्र.२)मध्ये नमुद केलेली कागदपत्रे नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

**प्राधिकृत अधिकारी स्वाक्षरी**

**(नाव-...............................................)**

**[कंपनी शिक्का]**

**सूची -३:**
**आर्थिक प्रस्ताव–**

**प्रती,**
**मा. संचालक,**
सर्व्हे क्र. ३९८-४००, सी.आर, पी.एफ कम्प शेजारी,
पुणे मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे
,ता. मावळ, जि .पुणे पिन - ४१०५०६ ,

**विषय - राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र"भाडेतत्वावर घेणेकरीता**

**महोदय,**

**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था – तळेगाव दाभाडे येथील "बांबू मुल्यवर्धन केंद्र भाडेतत्वावर घेणेकरीता खालीलप्रमाणे आर्थिक बाबी सादर करणेत येत आहे.**

| अ.क्र. | तपशील | प्रती वार्षिक (आकड्यात) | प्रती वार्षिक (शब्दांत) |
|---|---|---|---|
| अ | "बांबू मुल्यवर्धन केंद्र" | | |
| | एकुण दर रक्कम रु | | |

मला/आम्हाला आपल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. त्यास अधिन राहुन प्रस्ताव दाखल करीत आहोत.

**प्राधिकृत अधिकारी स्वाक्षरी**

**(नाव-................................................)**

**[कंपनी शिक्का]**